# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स - २२६९२१०२

E-Mail :- 1) System@dte.org.in 2) Desk15@dte.org.in internet:- http://www.dte.org.in


क्रमांक :-१५/अर्थसं/ईबीसी-वसतीगृह भत्ता./२०१७-१८/ ५३

दिनांक:- 23 JUN 2017

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर .

विषय :- सन २०१६-१७ या वर्षासाठी "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" व "डॉ. पंजाबराव देशमूख वसतीगृह निवार्ह भत्ता योजना" या योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जाना मान्यता देण्यासाठी ऑन-लाईन सेवा (लिंक) सुरु करणेबाबत ...

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" या योजनेसाठी दिनांक ३१ डिसेंबर २०१६ पर्यंत व "डॉ. पंजाबराव देशमूख वसतीगृह निवार्ह भत्ता योजना" या योजनेसाठी दिनांक ९ जानेवारी २०१७ पर्यंत ऑन-लाईन द्वारे अर्ज भरुन घेण्यासाठी मुदत देण्यात आलेली होती. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करण्याकरीता दिनांक ३१ जाने,. २०१७ पर्यंत लिंक देण्यात आली होती, मात्र विहित मुदतीत विभागीय/संस्था स्तरावरुन अर्जाच्या छाननीचे कामकाज पूर्ण होऊ शकले नाही. त्यानंतर अर्जाच्या छाननी करीता विषेष बाब म्हणून दिनांक ४ मार्च, २०१७ ते दिनांक १० मार्च, २०१७ पर्यंत सदरहू योजनेची लिंक फक्त विभागीय कार्यालयांच्या तपासणी साठी चालू करण्यात आली होती, मात्र सदरहू कालावधीमध्ये प्रलंबित असलेल्या अर्जाबाबत शैक्षणिक शुल्कामधील बदल, संबंधित लाभार्थ्यांचे आवश्यक असणारी कागदपत्रे उशिराने प्राप्त झाल्यामुळे अशा विविध कारणामुळे अर्जाच्या छाननीचे कामकाज पूर्ण होऊ शकले नाही.

तसचे सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांनी केलेल्या विनंती नुसार सन २०१६-१७ मधील संस्था स्तरावर/ विभागीय कार्यालयास्तरावर प्रलंबित असलेल्या लाभार्थी विद्यार्थ्यांचे अर्जाची छाननी करण्याकरीता दिनांक २७ जुन २०१७ ते दिनांक १० जुलै २०१७ पर्यंत या कालावधी मध्ये सदर योजनेची आन-लाईन सेवा (लिंक) चालू करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील प्रलंबित अर्जाची छाननी संस्था स्तरावर/ विभागीय कार्यालयास्तरावर पूर्ण करण्यात यावी, यापुढे मुदत वाढ देण्यात येणार नाही, कोणत्याही कारणास्तव एकही विद्यार्थी सुध्दा या लाभापासुन वंचित राहणार नाही याची दक्षता सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांनी घ्यावी. त्याचप्रमाणे दिलेल्या निर्देशानुसार तात्काळ कार्यवाही करावी.

पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/ईबीसी./२०१७/1485

सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.

दिनांक 27 JUN 2017

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण

अमरावती.

प्रत :-

१) प्राचार्य, सर्व संस्था, अमरावती विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की, सोबतच्या पत्राच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.